ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

# महात्मा फुले यांचे कृषी विषयक धोरण आणि सद्यस्थिती

**डॉ .सुवर्णा भाऊसाहेब पाटील**
सहाय्यक प्राध्यापक इतिहास विभाग,
प्रतिष्ठान महाविद्यालय पैठण

**डॉ मनिषा भगवानराव काळे**
सहाय्यक प्राध्यापक, इंग्रजी विभाग
प्रतिष्ठान महाविद्यालय पैठण

★★★

**गोषवारा** – विद्येविना मती गेली ,मतीविना नीती गेली, नीतीविना गती गेली ,गतीविना वित्त गेले , वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले. प्राचीन काळापासून ते आजपर्यंत शेतकऱ्यांची स्थिती नेहमीच दयनीय राहिली आहे .महात्मा फुले यांच्या मते शेतकऱ्यांच्या अन्याय–अत्याचार दयनीय स्थिती साठी केवळ अशिक्षित पण हेच एक महत्त्वाचे कारण आहे. आणि हे वास्तव देखील आहे. येथील शेतकरी ,कष्टकरी ,शुद्र समाज हा नेहमीच आपल्या गुलामीत राहावा यासाठी भारतात नेहमीच भटब्राह्मणानी यशस्वी प्रयत्न केला व आजही ते वेगवेगळ्या माध्यमातून सर्व घटकातील समाजाला लुटत असताना दिसतो .इंग्रज भारतात येण्यापहिले देखील सर्व राजाकडे सरकारी कामात ब्राह्मणांचे प्राबल्य होते व इंग्रज भारतात आल्यावर देखील त्यांचे प्राबल्य राहिले कारण की युरोपियन अधिकारी ऐशारामी असल्याकारणाने त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे फार लक्ष दिले नाही. या सर्वांमुळे वेळोवेळी शेतकऱ्यांच्या अन्यायात भरच पडत गेलेली दिसते. तसेच आज जरी अनेक योजना शेतकऱ्यांसाठी राबविल्या जात असल्या तरी प्रत्यक्षात त्या गरजू शेतकऱ्यांपर्यंत कितपत पोहोचतात हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. शेतकरी व शेती यांची एकूण सर्व स्थिती कशी आहे याविषयीचे विवेचन या शोधनिबंधात करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे

**बीजशब्द** – शेती, भट ब्राह्मण ,दयनीय स्थिती, शिक्षण

**प्रस्तावना** – भारत हा कृशीप्रधान देश आहे .भारतीय परंपरेत शेती हा भांडवल निर्मितीचा मोठा भाग आहे. आजही भारतातील 70 टक्के लोक षेतीवर अवलंबून आहे. देषाची अर्थव्यवस्था शेतीवर अवलंबून असल्यामुळे शेती जीवनाला महात्मा फुले यांनी मोठ्या प्रमाणात प्राधान्य दिलेले दिसते. आधुनिक महाराष्ट्राच्या विकासात महात्मा फुले यांचे नाव अग्रक्रमाने येत. शिक्षण ,कृशी राजकारण ,समाजकारण अर्थकारण, धर्म ,साहित्य अशा अनेक क्षेत्रात नवे विचार ,नव्या जाणिवा आणि नवी मूल्य रुजविण्याचे काम त्यांनी केले. समाज परिवर्तनासाठी त्यांनी रचनात्मक कार्याला महत्त्व दिले. पाण्याची नासाडी व जमिनीची धूप थांबवणे शेतमालाला योग्य भाव व शेतकऱ्यांस पूरक असे सरकारचे धोरण व व्यापार हे घटक शेतकऱ्यांच्या प्रगती साठी आवश्यक आहे. स्वातंत्र्योत्तर काळात तर महाराष्ट्रीयन समाजात समाज परिवर्तन होण्यासाठी महात्मा फुले यांचे विचार अत्यंत महत्त्वाचे असल्याचे स्पष्ट होते.

महात्मा फुले यांच्या मते शेतकऱ्यांमध्ये कुणबी, माळी व धनगर असे तीन भेद आहे .जे लोक आपला उदरनिर्वाह शेतीवर करतात ते कुणबी होय. आपले शेतीचे काम सांभाळून बागायती करतात ते माळी व जे लोक शेतीबरोबर मेंढ्या, शेळ्याचें कळप बाळगतात ते धनगर होय. पण या जातीचा आपापसात बेटी व्यवहार होत नसे1. महात्मा फुले म्हणतात की भटब्राह्मण हे शेतकऱ्यांना जन्माला येण्याच्या आधीच त्यांच्या आईला ज्यावेळेस ऋतू प्राप्त होतो तेव्हापासून तिच्या गर्भधारणादी संस्कारा पासून ते मरेपर्यंत कित्येक संस्कार व पूजेच्या माध्यमातून लुटला जातो .मेल्यावर देखील श्रद्धाच्या माध्यमातून सामान्यांची अडवणूक करण्याचा कार्यक्रम असतो. भटब्राह्मण हे उन्हाळ्यात पंखे , पावसाळ्यात छत्र्या तर हिवाळ्यात पांढऱ्या धाबळ्या घेतात .तसेच पूजाअर्चासाठी शेतकऱ्याकडून तांदूळ, नारळ, खारीक, सुपारी ,साखर ,फळफळावळ घेतात .तसेच ब्राह्मण भोजन व यथासांग दक्षिणा देखील घेतात3. भट ब्राह्मण हे त्या काळी वेगवेगळ्या पूजाअर्चाच्या माध्यमातून अज्ञानी शेतकऱ्यांची मोठी लूट करत असत. त्यामुळे शेतकऱ्यांची स्थिती दिवसेंदिवस जास्तच दयनीय होत गेलेली दिसते. यात पेशवे कालखंडात आणखीनच भर पडलेली दिसते. आज देखील शेतकरी व बहुजन समाज हा शिक्षण घेत असला तरी त्यामध्ये फार काही बदल झालेला दिसत नाही.

ज्यांना स्वतःची गुलामगिरी समजत नाही ते गुलामगिरीतून कसे मुक्त होणार असे महात्मा फुले म्हणतात. शेतकरी, शेतमजूर तसेच बारा बलुतेदार व अठरा अलुतेदार हा सर्व शेतीशी संबंधित असलेला समूह म्हणजे कुणबी होय. कुलकर्णी हे शेतसाऱ्यामुळे शेती जीवनाशी निगडित होते. पौराहित्य करणारा ब्राह्मण कुणब्याचे विधी, व्रत,वैकल्यं सण ,समारंभाच्या माध्यमातून शोषण करत होते .शेतीशी संबंधित संपूर्ण समाजाला महात्मा फुले हे षूद्र ५ म्हणून संबोधतात. कुणबी शूद्रांची सामाजिक सांस्कृतिक व आर्थिक स्थिती अत्यंत दयनीय होती .पेशव्यांची तिजोरी त्यांच्या ऐशरामामुळे रिकामी झाली की जुलूम जबरदस्तीने शेतकऱ्यांकडून शेतसारा गोळा केला जात असे .दुष्काळात शेतकऱ्याने अधिकाऱ्यांनी सांगून शेतसारा दिला नाही तर त्यांच्या मुलांच्या अंगावर कढईतील उकळते तेल टाकले जाईल, ओणवे उभे करून चाबकाने फटके मारत ,वाकून धुरावर डोके धरून त्यांच्या कानात बंदुकीची दारू उडवीत. पेशवाईतील शेतकऱ्याच्या दैन्यावस्थेला तीन घटक जबाबदार होते.१) अवर्षणग्रस्तता २)पेशवाई ३) पौरोहित्य करणारे ब्राह्मण होय. पेशवाईतील शेतकरी हा धर्म ,जात बंधनामुळे अधिकच पिळला जात असे. या काळात शेती व्यवसाय निसर्गावर अवलंबून होता .काही तुरळक राज्य वगळता

इतर राज्यकर्ता वर्ग हा उदासीन असल्याने शेतकऱ्यांच्या शोषणात भरच पडलेली दिसते . छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यात शेतकऱ्यांच्या भाजीच्या दठालाही हात लावण्याची सैनिकांना मुभा नव्हती. पण पेशवाईत जनता त्रस्त झाली होती. बाजीराव पेषव्याने शेतकऱ्यांना साऱ्यासाठी अनेक प्रकारच्या शिक्षा देऊन देशोधडीला लावले होते.

भारतातील संस्थाने हे भटब्राह्मणांच्या कारस्थानाला आळा घालतील असे वाटत नाही .कारण की ते ब्राह्मण कारभाराच्या ओंजळीने पाणी पिऊन दिवसा गोप्रदाने व रात्री प्रजोत्पादन करीत स्वस्त बसतात . अशा संस्थानीकाकडून शेतकरी शूद्र यांचे कल्याण होणे शक्य नाही असे महात्मा फुले म्हणतात. ब्राम्हणो मम दैवत हे वेड त्यांच्या डोक्यातून जात नाही तोपर्यंत शेतकऱ्यांचा विकास शक्य नाही. एकूणच येथील शेतकऱ्यांच्या स्थिती साठी येथील धार्मिक बाब मोठ्या प्रमाणात अडसर झालेली दिसते. इंग्रजांची सत्ता आल्याने अनेक राज्य समाप्त झाली त्यामुळे सैन्यात वेगवेगळे काम करणारे सैनिक हे बेकार झाली .या सर्वांचा बोजा शेतीवर पडला पण आधुनिक पद्धतीने शेती करण्याचा अभाव असल्याकारणाने शेती वरील उत्पन्नात फार काही वाढ झालेली दिसत नाही. महात्मा फुले हे आधुनिक शेतीचा आग्रह धरताना दिसतात. पण आधुनिक शेतीसाठी शेतकऱ्यांना सर्वात पहिले शिक्षण मिळाले पाहिजे. सरकाने लोकलफंड गोळा करून पैसा जमा केला पण अशा शाळेत शिकवणारा शिक्षक हा ब्राह्मण असल्याकारणाने तो शेतकऱ्यांच्या मुलास काय शिक्षण देणार हा प्रश्न निर्माण होता. त्यामुळे ते ठोंबे राहणार असे महात्मा फुले म्हणतात. व ते वास्तव देखील होते. तो शिक्षक स्वतः शेतकरी नसल्याने त्याला फार आस्था असण्याचं कारण नाही. जे लोक आपल्या मतलबी धर्माच्या बडीवारामुळे शेतकऱ्यांचे शोषण करतात ते काय शिक्षण देणार 10. म्हणून नंतर छत्रपती शाहू महाराज हे म्हणतात की ज्या गटाचे नेतृत्व त्याच गटातील व्यक्तीने करावे. प्राण्यामध्ये सुद्धा वाघाच्या गटाचे नेतृत्व वाघच करतो.तर शेळीच्या गटाचे नेतृत्व शेळीच करते.

उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी ही व्यवस्था भारतात केवळ नावाला दिसते. असे असते तर महात्मा फुले यांना शेतकऱ्यांवरील अन्याय अत्याचाराविरुद्ध वाचा फोडावी लागली नसती. आज तर हे वाक्य उलट झालेले दिसते उत्तम नोकरी ,मध्यम व्यापार व कनिष्ठ शेती. आज महाराष्ट्रात गरीब शेतकऱ्यांच्या मुलांना बायका देखील भेटत नाही. यावरून देखील आपल्याला हे स्पष्ट होते की आज देखील शेतकऱ्यांची दयनीय स्थिती आहे .परत मुलांना बायका मिळावा यासाठी शेतकरी समूह अनेक पूजाअर्चामध्ये गुंतलेला दिसतो .या सर्वांवरून हे स्पष्ट होते की भटब्राह्मणाचे प्राबल्य कमी झालेले नाही .आजच्या आधुनिक समाजात वैदिक पद्धतीने लग्न समारंभ करण्याचे खूळ निर्माण करून जनतेतकडून मोठ्या प्रमाणात दक्षिणा मिळवली जात आहे. विधीला लागणारा वेळ जास्त तर दक्षिना देखील जास्त ही वास्तविकता आहे.

महात्मा फुले यांनी बळीराजाचे मिथक महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर जातींना एक वेगळे सांस्कृतिक भान देण्यासाठी वापरले . बळीराजाचे राज्य हे शेतकऱ्यांचे राज्य ही बाब त्यांना मान्य होती म्हणूनच लोकशाही क्रांतीसाठी त्यांना हे आवश्यक वाटले. बळीचे राज्य हे लोकसत्ताक होते. बळीचे राज्य प्रस्थापित करणे म्हणजे शेतकऱ्यांचे व कामकऱ्यांचे आदर्श राज्य प्रस्थापित करणे होय .हे राज्य सर्वधर्म समभाव ,परस्परांच्या हक्काची जाणीव व सत्यवर्तन निर्माण करणाऱ्या लोकांचे राज्य होय. महाराष्ट्रात आज देखील स्त्रिया ओवाळतानी ईडा पिडा जावो ,बळीचे राज्य येवो श्असे म्हणतात .लोक मनात बळीराजा आज देखील घर करून असल्याचे यावरून स्पष्ट होते. महात्मा फुले गुलामगिरी ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हणतात की ज्या ईश्वराने शुद्राद्री अतिशुद्रास व इतर लोकस आपण निर्माण केलेल्या सर्व सुष्टीतील वस्तूचा सारख्या रीतीने उपभोग घेण्याची मोकळीक दिली असून भटलोक त्यांचे नावाचे खोटे ग्रंथ बनवून त्याजमध्ये सर्वांचे हक्क रद्द करून आपण अग्रगण्य होऊन बसले ज्यां ईश्वर्याने ही सृष्टी निर्माण केली तो भेद करत नाही.तर तुम्ही आम्ही कोण. ग्रंथ निर्मिती मानवाने केली आहे त्यात चुका असणे सहाजिक आहे .ग्रंथ म्हणजे पूर्णसत्य मान्यतेची गरज नाही. शेतकऱ्याच्या आसूड मध्ये महात्मा फुले जलसिंचन याविषयी म्हणतात की त्याचप्रमाणे आमच्या दयाळू सरकारने एकंदर सर्व डोंगर टेकड्यामधील दऱ्याखोऱ्यांनी तलावतळी ,जितकी होतील तितकी सोयीसोयीने बांधून काढावीत .म्हणजे त्यांच्या खालच्या प्रदेशात ओढ्याखोड्यांनीं भर उन्हाळ्यांत पाणी बसल्यामुळे जागोजागी लहान–मोठी धरणे चालून एकंदर सर्व विहिरींस पाण्याचा पुरवठा होऊन शेतकऱ्यांसहीत सरकारचा फायदा होणार आहे . एकंदर सर्व शेतें धुपून त्यामध्ये खोंगळया पडू नयेत, म्हणून सरकारने शेतकऱ्यापासून पाणलोटाच्या बाजूने शेतांच्या बांधांनी वरचेवर ताली दुरुस्त ठेवाव्यात, आमचे दयाळू सरकारने आपल्या राज्यांतील एकंदर सर्व शेताच्या पाहण्या पाणाड्याकडून ज्या ज्या ठिकाणी दोनग्या मोटांचे वर पाण्याचे झरे सापडतील, असा अदमास निघेल ,त्या सर्व जागांच्या खुणा त्या त्या गावंच्या नकाशांनी नमूद करून केवळ सरकारच्या माहितीशिवाय पाण्याचा मार्ग दाखविणाऱ्या पाणडयासह विहिरी खोदून बांधून काढणाऱ्या शूद्र शेतकऱ्यास लहान मोठी बक्षिसे सरकारातून देण्याची वहिवाट घालावी शूद्र शेतकऱ्यांस लहानमोठी बक्षिसे सरकारांतून देण्याची वहिवाट घालावी. शेतीसाठी पाणी असणे हे अत्यंत महत्वाचे आहे .चांगल्या प्रकारे शेती करायची असेल तर महात्मा फुले यांच्या मते जलसिंचनाचे उपाय महत्त्वाचे दिसतात. आज देखील फुले यांनी सांगितलेला उपाययोजनेनुसार महाराष्ट्रात जलसिंचनाची जलयुक्त शिवारा सारखी अनेककामे सुरू आहे .यावरून महात्मा फुले यांची दूरदृष्टी लक्षात येते.

भारतात इंग्रजी सत्ता प्रस्थापित होताच हळूहळू सर्व संस्थाने खालसा केली . त्यामुळे त्या संस्थांनाशी निगडीत लोक शेतीकडे वळले . यामुळे शेतीवरील बोजा वाढला पण उत्पादन न वाढल्यामुळे दारिद्र्यात आणखीनच भर पडली. तसेच सर्वच जंगल संपत्ती इंग्रजांनी ताब्यात

घेऊन त्यात पर्वत, डोंगर ,टेकड्या ,दरीखोरी ,पडीत जमिनी, गायरान मिळून फॉरेस्ट खाते तयार केल्यामुळे जंगलावर ज्या लोकांचा उदरनिर्वाह चालत असे तो बंद झाला त्यांचा ही बोजा शेतीवर पडला. तसेच सरकार शेतकऱ्याकडून कर घेई मात्र त्या प्रमाणात सुविधा देत नसे. तसेच अनेक वस्तू इंग्लंड वरुन भारतात येऊ लागल्यामुळे व त्या स्वस्तात विकल्या जात असल्यामुळे बेरोजगारीत आणखीनच भर पडलेली दिसते.

शेतकरी समाजाला तलाठ्याच्या, कुलकर्णीच्या जाचातून वाचवावं. शेतकऱ्याच्या पैशातून जमा होणारा फंड आर्यभटांना शिकवण्यासाठी वापरू नका. तो शेतकऱ्यांच्या मुलांसाठी वापरा. हे त्यावेळी महात्मा फुले यांनी सांगितले. शेतकरी वर्गाला या व्यवस्थेविरुद्ध सावध करत असताना त्यांनी शेतकरी वर्गातील अज्ञानावरही आक्रमकपणे कोरडे ओढलेले दिसते. आजही शेतकरी अनेक नवनवीन समस्येला सामोरे जात असल्याचं दिसते. आजही शेतकरी अनेक नवनवीन समस्येला सामोरे जात असल्याचं दिसते. आज देखील शेतकऱ्यांच्या आत्महत्या मोठ्या प्रमाणात वाढल्या आहे जलसिंचनाचा अभाव, दुष्काळ व अवकाळी पाऊस यामुळे उत्पादन घटत आहे तर दुसरीकडे महागाई मोठ्या प्रमाणात वाढत आहे पण शेतकऱ्याच्या मालाला पाहिजे तो भाव मिळत नाही . कात्रीत सापडलेला हताश शेतकरी आत्महत्या करतांनी दिसतो. सरकारने आत्महत्येची कारणे जाणून उपाययोजना करणे आवश्यक आहे तसेच सप्टेंबर २०२० मध्ये केंद्र सरकारने कृशी क्षेत्राशी संबंधित तीन कायदे मंजूर केले आहे. १) शेतकरी उत्पादने व्यापार व वाणिज्य कायदा. २) शेतकरी किंमत आश्वासन व कृशी सेवा करार कायदा. ३) अत्यावश्यक वस्तू कायदा. या कायद्यामुळे बाजार समित्या बंद होणार असल्याने शेतकऱ्याच्या मालाला हमीभाव मिळणार नाही. कंत्राटी शेतीमध्ये मोठमोठ्या कंपन्या शेतकऱ्या बरोबर करार करणार. यामध्ये शेतकऱ्याच्या मताला किती महत्त्व असणार हा एक प्रश्नच आहे. अशा अनेक तरतुदी या कायद्यात आहे . त्यामुळे या कायद्याला संपूर्ण भारत भर मोठा विरोध होताना दिसत आहे. भारतात शेतकरी हितासाठी आम्ही हा कायदा करत असल्याचे केंद्र सरकार म्हणत आहे .पण प्रत्यक्षात हा कायदा भांडवलदारांच्या हितासाठी दिसतो. शेतकरी कित्येक दिवसापासून कोरोना स्थितीत देखील आंदोलन करत आहे. पण सरकारला ह्या विषयी योग्य भूमिका घेत असल्याचे दिसत नाही.

महात्मा फुले यांनी श्रम करणारा शेतकरी हा आपल्या विचारांचा केंद्रबिंदू ठरलेला दिसतो .मध्यम व कनिष्ठ शेतकरी हा त्यांच्या चिंतनाचा प्रमुख आधार आहे. शेती सुधारणेच्या संदर्भात त्यांनी सुचवलेले उपाय वर्तमानातही चिंतनीय असल्याचे लक्षात येते. भारतीय समाजावर भटब्राह्मणांचे मोठ्या प्रमाणात प्राबल्य होते.त्यात भारतीय शेतकरी मोठ्या प्रमाणात पिळून निघालेला आपल्याला दिसतो. शेतकऱ्यांच्या अज्ञानामुळे त्यांची मोठ्या प्रमाणात दयनीय स्थिती निर्माण झाली. त्यामुळे महात्मा फुले यांनी शिक्षण आणि त्यातही स्त्री शिक्षणाच्या माध्यमातून समाज परिवर्तनाला एक नवीन दिशा दिलेली दिसते. दारिद्र्य व अज्ञानामुळे होणारे शोषण थांबविण्यासाठी शेतकऱ्यांना शिक्षित केले पाहिजे. ज्ञानाधारित शिक्षणाबरोबरच कृशी व व्यावसायिक शिक्षणावर भर दिला तर खऱ्या अर्थाने जनतेचा विकास होईल असे त्यांना वाटत होते आणि ते वास्तव देखील आहे आजच्या काळात देखील व्यावसायिक व कृषीविषयक शिक्षणाच्या माध्यमातून कृषिक्षेत्रात मोठ्या प्रमाणात प्रगती झालेली दिसते. या सर्वांच्या माध्यमातून महात्मा फुले यांनी कृशी प्रधान देशात शेती व शेतकऱ्यांची प्रगती हिच देषाची प्रगती असल्याचे मांडले आणि ते वास्तव देखील आहे. महात्मा फुले यांचे विचार हे आजही प्रासंगिक असल्याचे लक्षात येते. खऱ्या अर्थाने बहुजन समाजाला अन्याय अत्याचारातून बाहेर काढण्यासाठी महात्मा फुले यांनी अनमोल असे कार्य केल्याचे स्पष्ट होते. माणसाला माणसासारखं जगण्याचं बळच त्यांच्यामुळे मिळाले.

### संदर्भसूची

१) *महात्मा फुले समग्र वाडःमय , संपा धनंजय कीर ,डॉ.स.ग मालशे आणि य. दी. फडके, महाराष्ट्र राज्य साहित्य व सांस्कृती मंडळ मुंबई,२००६ ,पृ. २६३.*

२) *उपरोक्त, पृ २६७.*

३) *उपरोक्त, पृ २६८.*

४) *महात्मा फुले शोधाच्या नव्या वाटा, संपा . हरी नरके ,मुंबई २००६, पृ.२१६–२१७.*

५) *महात्मा फुले यांचे शूद्रातिषूद्रविषयीचे विचार,सुलभा मुंडे, औरंगाबाद, २००० पृ २५–२६.*